“नॉर्थ कॅनरा जी. एस्. बी. वृत्तविलास”

दि नॉर्थ कॅनरा गौड सारस्वत ब्राह्मण संघाची त्रैमासिक

# मुखपत्रिका


कार्यालय फोन : २३८७७३०१, २३८८००७३

**WEB SITE : http://www.nkgsbsangh.org**

**E-MAIL : nkgsbs@gmail.com**

कार्यालयीन वेळ : दुपारी ३ ते ७ (शनिवारी ३ ते ५)


।। आत्मैव आत्मनः बन्धुः।।

मूल्य रु. ५


| क्रमांक १ | वर्ष : ४० | एप्रिल–जून २०१८ |
|---|---|---|

**BOOK PACKET (PERIODICAL)**

Regd. with Registrar of Newspaper of India, Reg. No. RN37436/80


**TO,**


**From :** The NKGSB Sangh, Laxmi Sadan, 361, V.P. Road, Mumbai - 400 004.


# ठाणे मंच - वसंतोत्सव मेळावा

**दिनांक शनिवार २१ एप्रिल २०१८**

**वेळ : दुपारी ४ ते ८**

**स्थळ : सहयोग मंदिर, सहयोग मंदिर पथ, विष्णुनगर, नवपाडा, ठाणे (प.)**

* नृत्य, संगीत व तत्सम कलांचा आविष्कार सादर करण्याची उत्तम संधी

* ज्येष्ठ नागरिकांनी सुद्धा भाग घ्यावा ही नम्र विनंती.

* इच्छुकांनी त्वरीत संपर्क साधावा.

| सुरेश पालेकर | मंजिरी कुलकर्णी | चित्रा कामत |
|---|---|---|
| ९९६९४५५३७० | ९६६५०९८११७ | ९८३३६६९७८८ |

## एज्युकेशन सोसायटीच्या नव्या कार्यकारिणीची निवडणूक : सोसायटीच्या सभासदांना सूचना

एज्युकेशन सोसायटीची कार्यकारिणी, निवडून आलेले एक अध्यक्ष, आठ सभासद व दोन स्वीकृत सभासद अशा अकरा सभासदांची असते. सध्याच्या कार्यकारिणीची मुदत ३१ मार्च २०१८ रोजी संपत आहे. तेव्हा ज्या सभासदांना २०१८–२०२१ या तीन वर्षासाठी अध्यक्ष वा कार्यकारिणी सभासद म्हणून काम करावयाचे असेल त्यांनी एज्युकेशन सोसायटीच्या कार्यालयातून छापील अर्ज घेऊन सूचक व अनुमोदक यांच्या सह्यांसह अर्ज पूर्ण करुन शुक्रवार दिनांक २७ एप्रिल २०१८, संध्याकाळी ६.०० वाजेपर्यंत कार्यालयात सादर करावेत.

## संपादकीय

### ज्येष्ठ कथा व कादंबरीकार श्री. वसंत नरहर फेणे कालवश

मुखपत्रिकेच्या गेल्या अंकात ज्येष्ठ कथा व कादंबरीकार श्री. वसंत नरहर फेणे यांनी ९० व्या वर्षी लिहिलेल्या सहाशे पानी 'कारवारी माती' या बृहद्कादंबरीचे २ डिसेंबर रोजी ग्रंथालीतर्फे प्रकाशन झाले, याबद्दल वृत्त दिले होते. त्यांचे अलीकडेच ६ मार्च रोजी अल्पशा आजाराने देहावसान झाले. त्यांच्या निधनाची वार्ता मराठी वृत्त वाहिन्या व दैनिके यांत विस्तृतपणे देण्यात आली होती, यावरून त्यांची थोरवी समजते. शेवटपर्यंत त्यांनी उमेदीने आयुष्य व्यतीत केले. निधनापूर्वी काही दिवस अगोदरच ग्रंथाली व मुंबई मराठी साहित्य संघ यांच्या संयुक्त विद्यमाने साहित्य संघात ग्रंथालीने अलीकडेच प्रकाशित केलेल्या दोन कादंबऱ्यांवर चर्चा घडविण्यात आली होती. त्या दोन्हींमध्ये 'कारवारी माती' ही एक कादंबरी होती. या चर्चेत त्यांनी सहभाग घेतला होता. नंतर त्यांची प्रकृती खालावली व त्यांचे देहावसान झाले. मरणोत्तर त्यांच्या इच्छेनुसार देहदान करण्यात आले.

त्यांचा जन्म जोगेश्वरी येथील प्रती कारवार समजल्या जाणाऱ्या सरस्वती बागेत झाला होता. त्यांचे वडील नरहर साबाजी फेणे व पु.लं.चे आजोबा वामन मंगेश दुभाषी हे सरस्वती बागेच्या आद्य प्रवर्तकांपैकी होते. ते चार वर्षाचे असताना त्यांच्या वडिलांचे निधन झाले व त्यांचे कुटुंब कारवार येथे स्थलांतरीत झाले. त्यामुळे त्यांच्या रक्तात कारवारी माती भिनलेली होती.

त्यांची सुमारे तीस पुस्तके प्रकाशित झालेली आहेत. सर्वसामान्य माणसांचे अनुभव उत्कृष्टपणे रेखाटणे हे त्यांच्या लिखाणाचे वैशिष्ट्य होते. त्यांच्या कथा फक्त भारतीय वातावरणात घडलेल्या नव्हत्या, तर अमेरिका, दक्षिण आफ्रिका, इराण आदी परदेशातील जीवनशैलीचीही त्यांच्या लिखाणाला पार्श्वभूमी होती. त्यांची 'विश्वंभरे बोलविले' ही कादंबरी फार गाजली. या कादंबरीला २००५ साली मॅजेस्टिक प्रकाशनतर्फे प्रतिष्ठित 'जयवंत दळवी' पुरस्कार प्रदान करण्यात आला होता. गेल्या वर्षी 'शब्द द बुक गॅलरी' या संस्थेतर्फे भाऊ पाध्ये साहित्य गौरव पुरस्कार त्यांना देण्यात आला होता. त्यांच्या 'काना व मात्रा' या पहिल्याच कथा संग्रहाला राज्य शासनाचा सर्वोत्कृष्ट साहित्याचा पुरस्कार मिळाला होता. ते एस्‌टी.मध्ये कामाला होते. बदलीच्या नोकरीमुळे ठाणे, पुणे, नाशिक इत्यादी ठिकाणी ते वास्तव्याला होते. त्यामुळे त्यांच्या अनुभवविश्वाचे क्षितीज रुंदावत गेले. त्या अनुभवावर आधारित 'सेन्ट्रल बस स्टेशन' हे पुस्तकही गाजले.

सूक्ष्म निरीक्षण, सुगम भाषाशैली, राजकीय व सामाजिक प्रक्रियांची नेमकी उमज, मानवी नाते संबंध इत्यादी गुण वैशिष्ट्यांचा मिलाफ असलेले फेणे यांच्या निधनाने साहित्य विश्वात पोकळी निर्माण झाली आहे. दिवंगत फेणे यांना संघातर्फे आदरांजली.

**हे परीक्षेचे दिवस असल्याने सर्व विद्यार्थ्यांना हार्दिक शुभेच्छा.**

**१ एप्रिल २०१८**



## एज्युकेशन सोसायटी – शिष्यवृत्तीसंबंधी निवेदन

**एज्युकेशन सोसायटीतर्फे शालेय व महाविद्यालयीन शिक्षणासाठी आर्थिक साहाय्य दिले जाते. लाभार्थींनी अर्ज पाठविण्याची शेवटची तारीख पुढीलप्रमाणे :**

| | |
|---|---|
| **१ली ते १० वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी** | **३० जून २०१८** |
| **महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी** | **३० जुलै २०१८** |

**(मेडिकल व इंजिनियरिंगच्या विद्यार्थ्यांनी प्रवेशानंतर अर्ज पाठवले तरी चालतील) याशिवाय खाली नमूद केलेल्या अभ्यासासाठीही शिष्यवृत्ती देण्यात येतात. संबंधित पालकांनी व गरजू विद्यार्थ्यांनी याची कृपया नोंद घ्यावी व त्याचा पूर्ण लाभ घ्यावा, ही विनंती.**

**विषय :**

- **संगीत, नाटक, नृत्य**
- **व्यायाम, क्रीडा, गिर्यारोहण**
- **राज्य व राष्ट्रीय पातळीवरील परीक्षा (सी.ए. कॉस्टिंग, एन.डी.ए. सिव्हील सर्व्हिसिस इ)**
- **संगणकावर आधारित प्रशिक्षण**
- **वैदिक अभ्यासक्रम, गीताभ्यास**
- **जर्मन, फ्रेंच इत्यादी परकीय भाषा**
- **शैक्षणिक सहल**

दहावी-बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी खास वर्ग किंवा कोचिंग क्लासेस यासाठी लागणारा खर्च संस्थेच्या उत्पन्नानुसार देण्यात येईल व तो कार्यकारिणीच्या विचाराधीन असेल.

**कर्जाऊ शिष्यवृत्त्या :** उच्च शिक्षणासाठी कर्जाऊ शिष्यवृत्त्या देण्यात येतात.
भारतातील उच्च शिक्षण रु. २,००,००० (प्रतिवर्षी १,००,०००)
परदेशातील उच्च शिक्षण रु. २,००,००० (एक रकमी)

**गृहिणींसाठी :** गृहिणींसाठी कुठल्याही व्यावसायिक किंवा संगणक शिक्षणासाठी अर्ज करुन शिष्यवृत्तीचा लाभ घेता येईल.
शैक्षणिक पात्रता : बारावी

विशेष माहितीसाठी कार्यालयात येऊन चौकशी करावी अथवा २३८७७३०१ वर कार्यालयीन वेळांत संपर्क साधावा.

## प्रकाश झोत

### ‘निर्यातश्री’ श्री सतीश वाघ यांच्या शिरपेचात आणखी एक तुरा
### निर्यातीतील भरीव कामगिरीबद्दल राज्यातून पहिल्या क्रमांकाचा पुरस्कार

श्री सतीश वाघ हे धडाडीचे तरुण उद्योजक म्हणजे ‘सुप्रिया लाईफ सायन्स लिमिटेड’ या कंपनीचे मालक. ही कंपनी औषधे बनविणाऱ्या उद्योगांना लागणाऱ्या बल्क ड्रग्सची निर्मिती करते. कंपनीची सुमारे दोन डझन प्रकारची उत्पादने आहेत व ती जगभरातल्या अंदाजे सत्तर देशांत निर्यात केली जातात. २०१० साली केंद्रीय उद्योगमंत्र्यांच्या हस्ते दिल्ली येथे फेडरेशन ऑफ इंडियन एक्स्पोर्ट ऑर्गनायझेशनतर्फे दिला जाणारा प्रतिष्ठित असा ‘निर्यातश्री’ हा पुरस्कार त्यांना प्रदान करण्यात आला होता.

अलीकडे १९ फेब्रुवारी रोजी महाराष्ट्राचे उद्योगमंत्री श्री सुभाष देसाई यांच्या हस्ते २०१५-१६ वर्षांच्या Basic Chemicals, Pharmaceuticals and Cosmetic Products या क्षेत्रात निर्यातीसंबंधी भरीव कामगिरी केल्याबद्दल त्यांना पहिल्या क्रमांकाचा पुरस्कार मिळाला. गेल्या दोन दशकात त्यांना असंख्य प्रतिष्ठित समजले जाणारे पुरस्कार मिळालेले आहेत. त्यातील विशेष महत्त्वाचे पुरस्कार म्हणजे २००२ सालचा लघु उद्योगातील ‘बेसीक ड्रग्स’ याचे सर्वोत्कृष्ट उत्पादन केल्याबद्दल राष्ट्रपती अब्दुल कलाम यांच्या हस्ते मिळालेला पुरस्कार, २००१ साली लालकृष्ण अडवानी यांच्या हस्ते मिळालेला लघु उद्योगातील संशोधन व विकास यातील योगदानाबद्दल मिळालेला पुरस्कार, २००७ सालचा सर्वोत्कृष्ट व उदयोन्मुख उद्योजक म्हणून डॉ. मनमोहन सिंग यांच्या हस्ते मिळालेला राष्ट्रीय पुरस्कार यांची गणना करता येईल. श्री वाघ यांची उत्तरोत्तर अशीच प्रगती होवो ही सदिच्छा.

### कु. निधी देसाई हिचे शैक्षणिक क्षेत्रातील उज्ज्वल यश

ठाणे मंचचे एक क्रियाशील सभासद श्री. सदानंद व श्रीमती अपर्णा देसाई यांची नात कु. निधी नितीन देसाई हिने शैक्षणिक क्षेत्रात अव्वल यश मिळवले आहे. निधीने मणिपाल युनिव्हर्सिटीतून B.Pharm चे शिक्षण घेताना चारही वर्षे पूर्ण शिष्यवृत्ती मिळवली होती व ९.८./१० CGPA मिळवून २०१५ साली पदवी मिळवली. त्याच वर्षी झालेल्या राष्ट्रीय स्तराच्या GPAT परीक्षेत देशभरात १७ वा क्रमांकही मिळवला.

पुढे तिला University of Minnesota मध्ये Pharmacology ह्या विषयात मास्टर्स करण्यासाठी संधी प्राप्त झाली. तिथंही मास्टर्ससाठी CGPA ३.८/४ प्राप्त करून यश संपादन केले. तिला परदेशातील उच्च शिक्षणासाठी J. N. TATA Endowment ची पूर्ण शिष्यवृत्ती मिळाली आहे. निधी आता प्रसिद्ध Mayo Research and Clinic, Rochester, Minnesota, USA इथे Cancer Immunotherapy मध्ये Phd करत आहे.

शैक्षणिक यशाप्रमाणेच तिने भारतीय नृत्यकला (ओडीसी व भरतनाट्यम्) त्यातही प्रावीण्य मिळवले आहे. संघाच्या काही कार्यक्रमात तिने नृत्य सादर करून प्रेक्षकांची वाहवा मिळवली आहे. ठाणे येथे झालेल्या संघाच्या नृत्य स्पर्धेमध्ये तिला प्रथम क्रमांक मिळालेला होता.



### श्री. अभिजीत मुझुमदार याचे शिक्षण व क्रीडा या दोन्ही क्षेत्रांत उज्ज्वल यश

जुहु येथे राहणारी दीपा मुझुमदार ही माझी मामेबहीण. तिचे यजमान श्री. भालचंद्र सर्वोत्तम मुझुमदार यांचा कोमोडिटी एक्स्पोर्टचा व्यवसाय होता. त्यांचे २००७ साली निधन झाले. त्यांचा ३६ वर्षांचा मुलगा अभिजीत याने शिक्षण व क्रीडा या दोन्ही क्षेत्रांत उज्ज्वल यश मिळविले आहे. विलेपार्ले येथील एन्. एम्. कॉलेजमधून बी.कॉम्. व एम्.कॉम. या दोन्ही परीक्षा तो डिस्टींक्शनसह प्रथम वर्गात उत्तीर्ण झाला. नंतर अमेरिकेत जाऊन त्याने एम्. बी. ए. केले. तेथील **KPMG** या विख्यात कंपनीत गलेलठ्ठ पगाराची नोकरी सोडून मातृभूमीच्या प्रेमाखातर भारतात परतला. इथे बऱ्याच कंपनीत अनुभव घेतल्यावर अभिजीत आता ॲमेझॉन या कंपनीत **Chief Corporate Development Head** या वरिष्ठ हुद्यावर कार्यरत आहे.

लहानपणापासून त्याला खेळाची आवड. शाळेत असतानाच टेनीसमध्ये u-१२, u-१४, u-१८ या विविध गटांत त्याने राज्य व राष्ट्रीय पातळीवर पदके मिळविली आहेत. डबल्समध्ये तो नॅशनल चँपियन होता. अमेरिकेत असतानासुद्धा वेस्ट कोस्ट युनिव्हर्सिटी चँपियन म्हणून त्याने प्रथम क्रमांक मिळविला. त्याला धावण्याचीही आवड आहे. अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय मॅरॅथॉन शर्यतीत तो भाग घेत असतो. जून २०१८ मध्ये दक्षिण आफ्रिका येथे **Commorades** १०० कि.मीटर्सची शर्यत होणार आहे. म्हणून त्याची निवड झाली आहे. त्याच्या **यशासाठी हार्दिक शुभेच्छा!**

प्रेषक : **वामन (विकास) मंगेश नाडकर्णी**, दादर

### कु. आर्या सबनीस हिला डॉ. होमी भाभा बाल वैज्ञानिक स्पर्धेत रौप्य पदक

**‘डॉ. होमी भाभा बाल वैज्ञानिक’** ही निवड स्पर्धा बृहन् मुंबई विज्ञान अध्यापक मंडळातर्फे महाराष्ट्र राज्य पातळीवर भरविली जाते. ही स्पर्धा ६ वी ते ९ वी मध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी असते. २०१७-१८ या वर्षाकरिता राज्यभरातून ६० हजार स्पर्धक होते. लेखी परीक्षा, प्रॅक्टीकल व प्रकल्प सादरीकरण व वैयक्तिक मुलाखत या तीन टप्प्यांत ही परीक्षा घेतली जाते.

**‘सविता सबनीस फाऊंडेशन’** या नांवे संघाला सातत्याने देणगी देणारे एक हितचिंतक श्री. किशोर वासुदेव सबनीस यांची १४ वर्षांची नात कु. आर्या मोहन सबनीस ही ठाणे येथील सिंघानिया शाळेची दहावीची विद्यार्थिनी. कु. आर्याला यंदा वर नमूद केलेल्या स्पर्धेत रौप्य पदक मिळाले. ४ मार्च रोजी झालेल्या एका समारंभात डॉ. अनिल काकोडकर यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. मागे ६ वी त असताना २०१४-१५ साठी तिला सुवर्ण पदक मिळाले होते.

**कु. आर्याचे मन:पूर्वक अभिनंदन.**

# मुंबई मंचतर्फे कारवारी आनंद मेळावा

'अन्न हे पूर्ण ब्रह्म' हे ब्रीदवाक्य मनापासून जपणारी माणसं म्हणजे आपले कारवारकार. स्वयंपाक करणे हे नुसते रोजचे काम नाही तर तो माणसांना माणसांशी जोडणारा एक सुंदर आणि महत्त्वाचा मार्ग आहे याचा प्रत्यय मुंबई मंचने तारीख १८ फेब्रुवारी २०१८ रोजी आयोजित केलेल्या 'कारवारी खाद्य मेळाव्या'त आला. झगमगत्या विद्युत रोषणाईच्या प्रकाशात सजवलेले भव्य आकर्षक स्टॉल्स व कल्पकरीत्या मांडलेल्या टेबल-खुर्च्या यांच्या अवतीभवती उत्साहात वावरणाऱ्या खाद्यशौकीन मंडळींनी खचाखच भरलेल्या जोगेश्वरी येथील के. जी. एस. हाऊसिंग सोसायटीच्या पटांगणाला त्यादिवशी जत्रेचे स्वरूप आले होते. स्टॉलधारकांचा सहभागही या वर्षी अधिक होता.

सुकरुंडे, चवडे, उकडीचे मोदक, फणस व केळफूल यांच्या भाज्या अशा शाकाहारी पदार्थांसह तिसऱ्याचे वडे, कोंबडी-वडे, कोलंबी मसाला, सुरमई फ्राय, तंदूरी पदार्थ, चिकन बिर्याणी इत्यादी मांसाहारी खास खमंग पदार्थ खवय्यांना आकर्षित करत होते. थालिपीठ, दाबेली, दहीवडे, पॅटीज हेही साथीला होतेच. घरगुती उद्योजकांनी प्रदर्शित केलेले पापड, लोणची, सांडगे तसेच तयार कापडे, चादरी, पर्सेस, साड्या, इमिटेशन ज्वेलरी, कलाकुसरीच्या वस्तू व गिफ्ट आर्टिकल्सही लक्ष वेधून घेणारे होते.

आर्थिक प्रायोजिकत्वाचे श्रेय नेहमीप्रमाणे आपल्या एन. के. जी. एस. बी. बँकेला द्यायला हवे. बँकेचे चेअरमन श्री. किशोर कुलकर्णी यांनीही सपत्निक उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढविली. के. जी. एस. बी. को. ऑपरेटीव्ह हाऊसिंग सोसायटीच्या कार्यकारिणी मंडळाने सोसायटीचे पटांगण या कार्यक्रमासाठी उपलब्ध करून विशेष साहाय्य केले. त्याचप्रमाणे सारस्वत बँक, नाईन डायमेंशन हाऊसिंग सोसायटी लिमिटेड (शांतादुर्गा प्रोजेक्ट्स, माहीम), क्लब महिंद्रा हॉलिडेज यांनीही या कार्यक्रमासाठी मोलाचा हातभार लावला. विशेष म्हणजे इंडिअन फायर सेफ्टी सिस्टमने यंदा सुरक्षिततेसाठी fire extinguishers ची सोय विनामूल्य केली होती. या मेळाव्याच्या यशामागे असलेले भरपूर मेहनत घेणारे सर्व स्टॉलधारक, तसेच महानगरपालिका, अग्निशमन दल व पोलिस विभागाच्या परवान्यांचा त्रिविध ताप सहन करणारे मुंबई मंचचे कार्यकर्ते या सर्वांना सलाम!

– **मृदुला भांडारकर**, गिरगांव

| **स्टॉलधारक** | **खाद्यपदार्थ / इतर जिन्नस** |
|---|---|
| **तारा गायतोंडे** | मसाले, लोणची, तिसऱ्याचे वडे, सुकरुंडे |
| **विद्या कसबेकर** | चिकन खिमा पॅटीज, मेथी भजी, उकडीचे मोदक, चहा |
| **आशीष शिरोळकर** | कुंदा, करदंट, कडबोळी, बेळगावी साड्या |
| **जयश्री भेडसगावकर** | खिमा दाबेली, मसाले, चटण्या, इत्यादी खाद्य उत्पादने |
| **सीमा वागळे** | मटण मसाला, चिकन बिर्याणी, मसाला बांगडा, चवडे, बटाटा वडी |
| **पंचमी वैष्णव** | चिकन, खिमा, पॅटीज, व्हेजिटेबल पॅटीज |



| | |
|---|---|
| **सदाशिव वागळे** | **Wagale's Kitchen :** chicken masala, chicken shawarna, Chinese mixed fried rice, सुरमई / चिकन फ्राय, आंबा-डाळ, पन्हे |
| **वैशाली दळवी** | चिकन बिर्याणी, तिसऱ्याचे वडे, सुरमई व कोलंबी फ्राय, सुकरुंडे, फुटीकढी, भाजणी थालिपीठ, भाजणीचे पीठ |
| **लक्ष्मी पै** | लाडू, लोणची, पापड, सांडगे, इत्यादी / sarees & dress material |
| **देवीदास शेणॉय** | कोंबडी-वडे, शेव, चिवडा, इत्यादी |
| **निधी चव्हाण** | ladies purses and Lucknowi dresses |
| **महेंद्र कसबेकर** | organic food products |
| **किशोर बोरकर** | मसाला पोहे, लिंबू सरबत, कोकम सरबत |
| **शीतल लवंदे** | सुक्या सुंगटाची किसमूर, करंदी मसाला, करंदी-मेथी भजी, खिमा पाव, चहा |
| **गंगा सुतार** | खिमा पाव, कोलंबी मसाला, भाकरी, करंदी पकोडा, सोलकढी |
| **संगीता सातोस्कर** | गोवा व देवगड येथील प्रसिद्ध खाद्य उत्पादने |
| **उल्हास वांतेकर** | दहीवडे, साबुदाणा वडे |
| **राघवी सडेकर** | Ladies gowns and hand painted kurtis |
| **वंदना कामत** | Kurtis and artificial jewellery |
| **वरदा शिरसेकर** | लाडू, सांडगे व artificial jewellery |
| **गौरी भाटकर** | Ladies purses and bags. |
| **अमृता तळवडेकर** | Handmade gift articles |
| **सागर तावडे** | bread rolls |
| **स्वाती महात्मे** | चिकन सागुती / पाव, नाचणी पुडींग, chicken chilli |
| **सुविधा रांगणेकर** | चिकन सागुती, सुंगटाचे सुके, सुका जवळा कोशिंबीर, कोलंबी फ्राय / कटलेट, भाकरी, सोलकढी |
| **Corvi Creation** | Fashion accessories and designer dupattas |
| **सचिन ठाकूर** | तंदूरी चिकन व इतर तंदूर पदार्थ |
| **प्राजक्ता सहस्रबुद्धे** | पिठांचे विविध प्रकार |
| **Aditi Collection** | Kurtis, dresses and artificial jewellery |

## ठाणे मंच आयोजित दुसरा वधू–वर मेळावा

२६ नोव्हेंबर १७ रोजी माहीमच्या तेंडूलकर हॉलमधे ठाणे मंच तर्फे दुसरा वधू–वर मेळावा भरवण्यात आला. साधारणपणे ३२ उमेदवारांनी नावे नोंदविली होती. किरण दिवेकर यांनी नावे नोंदवून घेतली. सुरेखा पालेकर व गिरीश रेगे यांनी उमेदवारांचे अर्ज भरून घेतले. मंजिरी कुलकर्णीनी सर्व उपस्थितांचे स्वागत केले व सर्वांना नाश्ता घ्यायची विनंती केली. अपरिहार्य कारणामुळे काही मुले येऊ न शकल्याने त्यांच्या वतीने पालकांनी भाग घेतला.

सुरेश पालेकर यांनी ठाणे–मंचने सुरू केलेल्या वधू–वर सूचक मंडळाची तसेच आता कार्यरत असलेल्या Website (www.nkgsbmatrimony.com)ची थोडक्यात पण महत्त्वाची माहिती सांगितली. तसेच ठाणे मंचच्या इतर कार्याचीही माहिती सांगून सर्व उमेदवारांना शुभेच्छा दिल्या.

मंजिरी कुलकर्णी यांनी प्रत्येक उमेदवाराला बोलावून त्यांना त्याच्या भावी जोडीदाराबद्दलच्या अपेक्षा, तसेच त्याच्याबद्दलची आवड–निवड व छंद याबद्दल बोलण्यास सांगितले. सर्व मुलांनी अतिशय छान प्रतिसाद दिला व ज्या मुलांना गाता येत होते त्या सर्व मुलांनी जराही आढेवेढे न घेता सुरेल गाणी गाऊन सर्वांकडून वाहवा मिळविली. सर्व पालकांनी आपापल्या मुलाबद्दल त्यांच्या अपेक्षांबद्दल मनापासून विचार सादर केले.

सर्वांकडून सकारात्मक अशा प्रतिक्रिया आम्हाला मिळाल्या. काहीजणांनी वधू–वर मेळावा वर्षातून तीनचार वेळा, निदान दोनदा तरी आयोजित करण्याची विनंती केली. तर काहींनी मेळाव्याचे शुल्क वाढवा अशी सूचना केली. असो. पुढच्या वेळी प्रतिसाद नक्की वाढेल असे वाटते.

आमची साईट नक्की लक्षात ठेवा. **www.nkgsbmatrimony.com**

**मंजिरी मनोज कुलकर्णी**, ठाणे.

### ☺☺ विजूले चुटकुले ☺☺

टीचर : पार्वतीन् शंकराक घोव म्हण्ण कित्याक पसंत केले ?

सुरेश : शंकर वाघाले कातडे घाल्न फिरतालो म्हण्ण पार्वतीक कपडे धुवचो त्रास नाशिल्लो. दुसरे म्हळ्यार शंकर कंदमुळे खावनच रावतालो. तेना पार्वतीक सदा रांदप करचे पडनाशिले. तिसरे म्हळ्यार शंकराच्या तकलेचेर चंद्र आशिल्लो. त्यामुळे लोड शेडींगचो त्रास नाशिल्लो. चौथे कारण म्हळ्यार शंकराक आवय बापूय नाशिल्ले त्यामुळे पार्वतीक माय मावालॉ त्रास नाशिल्लॉ. ताजेखातेर पार्वतीन शंकराक घोव म्हण्ण पसंद केले.

**विजय सदानंद वागळे,** ठाणे. – ९२२१६०७५७७.



## ठाणे मंचची वार्षिक सहल

ठाणे मंचची एक दिवशीय सहल ७ जानेवारी १८ रोजी क्रिष्णा रिसॉर्ट येथे संपन्न झाली. खरं म्हणजे दोन वर्षापूर्वी क्रिष्णा रिसॉर्टलाच गेलो होतो. पण ठाणे मुंबईपासून जवळ, चविष्ट नाश्ता जेवण, इतर सर्वच दृष्टीने छान असल्यामुळे याच रिसॉर्टला पसंती दिली गेली. ठाणे–मुंबईच्या बसेस साधारण ९.३० पर्यंत रिसॉर्टला पोचल्या.

पोहे, मिसळ, वडा–पावचा नाश्ता करून काही मंडळी देवीदर्शनाला तर काही पोहायला गेली. नंतर श्री. सुरेश पालेकर यांनी इतर मंडळींना आपापले छंद पेश करण्यासाठी आपल्या खुसखुशीत शैलीने पाचारण केले.

आपल्या ज्ञातीतील सर्वात तरुण व उत्साही, ज्यांना आपण evergreen म्हणतो अशा दोघी म्हणजे तारामावशी गायतोंडे व मंगलाताई वागळे. ह्या कार्यक्रमाची सुरवात तारामावशीनी मस्त कोकणी कवना गाऊन केली. विनोदी झालर असलेल्या या कवनांना श्रोत्यांनीही ठेका धरला. सचिन पै, संजीव पै यांनी army based poem सांगून कवितेचा अर्थ उलगडून सांगितला. शैलजा पै या airhostess होत्या, त्यांनी वेगवेगळे अनुभव सांगितले. त्यांची कन्या रुतिका पै ही डागर बंधूंची शिष्या. तिने classcial based सुरेल गाणे पेश केले. अनिता प्रभू व स्कॉटलंड स्थित ऊर्जा प्रभू या मायलेकींनी आपल्या इंग्लंडमधल्या वास्तव्याचे अनुभव सांगितले. मृणाल दळवी यांनी विंदा करंदीकरांची 'देणाऱ्याने देत जावे' ही कविता छान सादर केली. सुधा दळवी या सध्याच आनंदवन (बाबा आमटे) येथे जाऊन आल्याने, त्यांनी भरभरून तिथल्या समाजसेवेचे वर्णन केले. हेमा कुलकर्णी यांनी महाभारतातील त्यांना भावलेला प्रसंग सांगितला. तेजश्री कुलकर्णीने छान गाणे सादर केले. सतीश वागळे यांनी नेहमीप्रमाणे बासरीवर सुरेल गाणे वाजवून श्रोत्यांना संमोहीत केले. प्रज्ञा वागळे यांनी आपल्या सुरेल आवाजात एक भजन व एक हिंदी गाणे पेश केले. मंगलाताई वागळे यांनी कुठलेही हेवेदावे मनात न ठेवता, निरपेक्ष प्रेम कसे करावे हे समरसून सांगितले. देवदास नाडकर्णी यांनी आपल्या छान स्वरचित कविता सादर केल्या. संध्या नाडकर्णी यांनी आपले अनुभव सांगितले. रेखा दाभोळकर यांनीही एक छान गाणे पेश केले. अपर्णा बोरकर यांनी दोन गाणी सादर केली. एका गाण्यात त्यांनी काही तरुणींना नाचायला उद्युक्त केले. तसेच आपल्या बोलण्याची सर्वांवर छाप पाडली. सर्वांत शेवटी उपस्थितांनी संध्याच्या गाण्यावर नाचून घेतले.

जेवणानंतर शैलेश, रसिका, प्रसाद, अर्चना या सर्व गायतोंडेजनीं games घेऊन पिकनिकला रंगत आणली. संगीत खुर्चीत महिला गटात पहिले पारितोषिक मृणाल दळवी यांना

मिळाले. मंगलाताई वागळे या गटात दुसऱ्या आल्या. पुरुष गटात पहिले पारितोषिक सतीश वागळे यांना मिळाले. दुर्गादास गायतोंडे दुसरे आले. Find Things या game मध्ये ६ ग्रुप्स केले होते. त्यात प्रसाद गायतोंडे (जोगेश्वरी) यांचा ग्रुप पहिला आला. Kitchen items in English या गेममध्ये अनिता प्रभू यांचा ग्रुप पहिला आला. शांता पालेकर या Passing the parcel मध्ये पहिल्या आल्या.

गरमागरम कांद्याची भजी, चहा व कॉफीने सहलीची सांगता झाली.

एकंदरीत सुटसुटीत मैत्रीपूर्ण वातावरणात सहल मस्त झाली. मुंबई बसचे नियोजन करण्यात विवेक कुलकर्णी व प्रसाद गायतोंडे, जोगेश्वरी यांची मदत झाली. तर संपूर्ण सहलीचे नियोजन सुरेश पालेकर व किरण दिवेकर यांनी केले.

पुढच्या वर्षी जास्त प्रतिसादाची अपेक्षा आहे.

– **मंजिरी मनोज कुलकर्णी**, ठाणे.

## विवाह /वाङ्‌निश्चय

| | | |
|---|---|---|
| सुस्मीत प्रसाद देसाई, दहिसर | व | प्रत्यूषा परिमल सिन्हा, धनबाद |
| सर्वेश सुधीर दिवेकर, हुबळी | व | आरती भाऊसाहेब चिकोर्डे, बेळगांव |
| अमेय संजय कुलकर्णी, दादर | व | मधुर सतीश जोशी, माहीम |
| सौरभ प्रवीण मुझुमदार, पुणे | व | अदिती महारुद्र (सुनील) ब्रह्मे, मालाड |
| मोहिनी (सायली) दत्तात्रय (अनिल) नाडकर्णी, ठाणे | व | आकाश शिरीश माजगावकर, मुंबई |
| प्रथमेश विवेक पिंगे, गोरेगाव | व | सोनाली किशोर कत्रे, बोरीवली |
| पूजा प्रेमानंद वाघ, दांडेली | व | गणेश दयानंद कामत, सोलापूर |

**विवाहाचा सुवर्णमहोत्सव गाठणाऱ्या जोडप्यांना गेल्या वर्षी स्नेहसंमेलनात स्मृतिचिन्हे देण्यात आली. त्यात गेल्या अंकात दिलेल्या यादीत गाळलेली नांवे**

| | | |
|---|---|---|
| **श्रीमती शुभदा व श्री. गोविंद मर्तोबा तेलंग** | – | माहीम |
| **श्रीमती सुनीता व श्री. भवानीशंकर गजानन वागळे** | – | मालाड |



## अखेर मला उत्तर सापडलेच!

तुम्हाला उत्तर सांगण्याआधी प्रश्न काय होता हे कळणे आवश्यक आहे. मला खात्री आहे की हा प्रश्न अखिल हिंदू समाजाला निश्चितच भेडसावीत आहे व तो म्हणजे आपल्या हिंदू समाजाला इस्लाम तसेच ख्रिश्चनधर्माप्रमाणे, स्वधर्मावर एवढी निष्ठा का नाही? कधी कधी आश्चर्यही वाटते– आपला समाज स्वतःच्या हिंदू धर्माबद्दल इतका उदासीन का?

वरील प्रश्नावर तोडगा म्हणून वीर सावरकरांची एक विचारसरणी मला बऱ्याच अंशी पटली आहे पण ती सुसंगतरीत्या तुमच्यासमोर ठेवण्यापूर्वी मी त्या विचारसरणीपर्यंत कसा पोहोचलो ते कळणे जरा आवश्यक आहे.

कॉलेजमध्ये असताना मला आध्यात्माचे विलक्षण वेड होते. श्रीरामकृष्ण परमहंस, स्वामी विवेकानंद, ऋषीकेशचे स्वामी शिवानंद, रमणमहर्षी, स्वातंत्र्यवीर सावरकर या सर्वांचे वाङ्मय मी अगदी कोळून प्यायलो होतो. इतकेच नव्हे तर संपूर्ण भगवद्‌गीता माझी पाठ होती. स्वामी शिवानंदांचे– Mind and its mysterious control नावाचे पुस्तक माझ्या खूप आवडीचे होते. माझा स्वामींबरोबर या विषयावर पत्रव्यवहारही झाला होता. कलकत्त्याला St. Xavier's College मध्ये Inter Science करताना मी घरून पळून बेलूर मठमध्ये श्री रामकृष्ण मिशनच्या आश्रमात साधक म्हणून भरती होण्यास गेलो होतो. पण त्यांनी मला घेतले नाही. जोपर्यंत मी १८ वर्षे पूर्ण करत नाही व आईवडिलांची लिखीत परवानगी आणत नाही तोपर्यंत मला आश्रमात प्रवेश वर्ज्य होता. त्यानंतर पुढील १५–२० वर्षांत माझ्यात खूपच फरक पडला.

सर्व प्रकारच्या सिगारेटस्, सिगार्सचे भरपूर सेवन केले, सर्व प्रकारच्या मद्यपानाचाही मनसोक्त आस्वाद घेतला. तीनपत्ती तसेच घोड्यांच्या शर्यतीचाही भरपूर अनुभव घेतला. Ball Room डान्सिंगच नव्हे तर ''साल्सा'' डान्सचे पण धडे घेतले. विविध प्रकारच्या मद्यांच्या Cocktails पण मी स्वतः कुशलतेने बनवू शकत होतो. पत्त्यातले तसेच घोड्यांच्या शर्यतीतल्या डावपेचावर मी खूपच अभ्यास केला होता. परंतु अशा व्यसनांच्या तडाख्यात सापडून सुद्धा मी माझ्या आवश्यक अशा कर्तव्याकडे कधीच दुर्लक्ष केले नाही. मला आपल्या हिंदू धर्माचा विलक्षण अभिमान होता व खात्री होती की आपला हिंदू धर्म सर्व धर्मांत श्रेष्ठ आहे. मी असे वाचलेही होते की साधक जर Self Realisation करिता साधना करीत असेल तर हिंदू धर्म हा असा एकच धर्म आहे जो त्याला त्याच्या ध्येयाच्या पूर्णत्वाला घेऊन जाऊ शकतो. मी असेही

ऐकले होते की, ख्रिश्चन तसेच इस्लाम धर्माचे साधक त्यांच्या याच साधनेच्या एका ठराविक पल्ल्यापर्यंत जाऊ शकतात, पण पुढे यशस्वी होण्यासाठी, साधनेच्या पूर्ततेसाठी, त्यांना हिंदू धर्मगुरुच्या दीक्षेचीच कास पकडावी लागते.

स्वामी विवेकानंदांना आपल्या लोकांनी विचारले होते की, मुसलमानांच्या धर्मांतराचे प्रचंड मोठे भूत भारताच्या मानगुटीवर बसलेले आहे. ख्रिश्चनांच्या धर्मांतराचे प्रचंड भूत भारताला त्रास देत आहे. अशा वेळेला हिंदूंनी काय करणे आवश्यक आहे? स्वामी म्हणाले – ''तुम्हाला खरोखरच जर याचा प्रतिकार करावयाचा असेल तर आपल्या धर्माबद्दल जसे मुसलमान आणि ख्रिश्चन सदैव जागृत असतात तसे तुम्ही सुद्धा जागृत व्हा. तुमच्या सगळ्या समस्यांचे निराकरण होईल. पण दुर्दैवाने इतरांना त्यांच्या धर्माबद्दल जी निष्ठा आहे त्या प्रमाणात निष्ठा आपण हिंदू दाखवत नाहीत.'' दर शुक्रवारी सायंकाळी ७चा नमाज असताना सगळे जवळपासचे मुसलमान पावणेसातलाच मशिदीजवळ हजर असतात. सगळ्यांची दुकाने, ऑफिसेस बंद असतात. आज कोणी खास पाहुणा येणार आहे असे एकही कारण कोणी देणार नाही. टि.व्ही.वरची मालिका आज खूपच छान आहे म्हणून त्यांची धार्मिक प्रार्थना कधीही थांबत नाही. त्यांचा इमाम मुल्ला किंवा मौलवी आल्यानंतर सगळ्या तऱ्हेचे मोह बाजूला सारून वाटेल त्या गर्दीच्या त्रासाची–सुखाची वाट समजून ते तिथे जातात व आपले संख्याबळ दाखवतात. आपले हिंदू असे काय करतात?

रामनवमीच्या दुपारच्या रामजन्माच्या कीर्तनावेळी, मालिका सुरू असल्याने सगळे टि.व्ही. समोर बसलेले, देवळांत कोणीही नाही! आणि हे एकदा हिंदू करतात हे टि.व्ही. चॅनेल्सना कळल्यावर गोकुळाष्टमीला टि.व्ही.वर सिनेमा लावतात. बसा घरी गोपाळकृष्णाला न बघता. आपल्या आचार्यांचे / स्वामींचे भाषण आहे तेव्हा सर्व मोह टाळून भाषणाला हजेरी लावणे आपल्या हिंदू लोकांत जरा कठीणच!

मी स्वतः एक प्रसंग माझ्या डोळ्यासमोर घडलेला पाहिलेला आहे. भायखळा विभागात शुक्रवारी संध्याकाळी सुमारे ७ वाजता मुसलमानांची नमाजाची जय्यत तयारी चालली होती. मशीद पूर्ण भरल्यामुळे लोक रस्त्यावर नमाजासाठी बसले होते. अशावेळी एक अलिशान नवी कोरीकरकरीत BMW कार तेथे आली. गाडीचा मालक स्वतः गाडी चालवीत होता. कशीबशी त्याने गाडी पार्क केली व आतील एक छोटी सतरंजी घेऊन तो सरळ इतर लोक रस्त्यावर बसलेले होते, तेथे धावत गेला व आपले आसन तेथे रस्त्यावरच मांडून इतरांबरोबर



नमाज पढण्यास सुरुवात केली. घाईघाईत त्याने कार लॉकसुद्धा केली नव्हती. त्याच्या बाजूला बसलेला कदाचित एखादा सफाई कामगारही असू शकेल पण त्याला त्याचे काहीच सोयरसुतक नव्हते. तो फक्त नमाज आटोपल्यावर ताबडतोब आपल्या गाडीकडे परतला व निघून गेला. केवढी ही निष्ठा?

वीर सावरकरांच्या खालील विचारसरणीवरच वरील प्रश्नावर तोडगा निघेल असे मला वाटते. हेच अखेर मला सापडलेले उत्तर!

सावरकर म्हणतात की, मुसलमानांचे मूल २ वर्षाचे झाले की एका महत्त्वाच्या प्रार्थनेचा भडीमार त्या मुलाच्या कानावर सतत होत असतो. 'ला इलाहा इल्लालाहु, मोहम्मद रसुल उल्लुला... वगैरे'. मुलाचा बाप भले मोठा डॉक्टर, इंजिनियर जरी असला तरी त्यालाही या प्रार्थनेपासून सुटका नाही. खरेतर अशी सुविद्य, समजूतदार माणसेच या प्रार्थने बाबतीत फारच जागरुक असतात. ख्रिश्चनांची सुद्धा अशीच एक प्रार्थना आहे व दर रविवारी संपूर्ण जगतात ती अतिशय आत्मीयतेने चर्चमध्ये म्हटली जाते. या प्रार्थना प्रादेशिक किंवा राजकीय नाहीत तर जागतिक आहेत. रशियातील मुसलमान, अमेरिकेतील मुसलमान, जगाच्या कुठल्याही कोपऱ्यात असलेल्या मुसलमानांची हीच प्रार्थना आहे. ख्रिश्चनांची सुद्धा प्रार्थना राष्ट्रीय नाही तर जागतिक आहे.

वीर सावरकर म्हणतात – हिंदू धर्मांतही अशी एक प्रार्थना आहे जी पूजेनंतर म्हटली जाते. ती प्रार्थना म्हणजे ''मंत्रपुष्पांजली''. ही हिंदूची मुळ प्रार्थना आहे व जगभर पसरलेल्या प्रत्येक हिंदूने ती नियमित म्हटली पाहिजे. पण तसे होत नाही. पूर्वी वेदकाळात, उपनिषदकाळात आरत्या नव्हत्या. या आरत्या नंतर समर्थांनी आणि इतरांनी लिहिलेल्या आहेत. पण प्रत्येक पूजेनंतर मंत्रपुष्प वाहिले जाते. तीच खरी आपली फक्त राष्ट्रीयच नव्हे तर जागतिक प्रार्थना! ही मंत्रपुष्पांजली प्रार्थना प्रत्येक हिंदूला आली पाहिजे. खरेतर आईबापांनी मुलांना ही शिकवली पाहिजे. पण आईबापांनाच ती नीट उच्चारता देखील येत नाही. इतकेच काय जे पौरोहित्य करतात त्यांना पण ती नीट उच्चारता येत नाही. विराट हिंदू समाजातील ८५–९० टक्के लोकांना ती म्हणताही येत नाही. या उलट मुसलमान, ख्रिश्चनांना त्यांच्या प्रार्थना १००% समाजाला पूर्णपणे ज्ञात आहेत.

आपली केवढी ही केविलवाणी परिस्थिती! तेव्हा जागे व्हा!!

हा लेख सर्वस्वी स्वामी विवेकानंद, स्वामी समर्थ, वीर सावरकर यांची वचने,

Whatsapp वर आलेल्या वक्त्याचे भाषण आणि केवळ माझ्या स्वानुभवावरच आधारित आहे. आध्यात्मावर, स्वधर्मनिष्ठेवर तुम्हाला उपदेश करण्याच्या योग्यतेचा मी निश्चितच नाही. उद्देश फक्त, माझ्यासकट आपणा सर्वांस सद्यपरिस्थितीबाबत जागरुक करण्याचा आहे. बाकी कालाय तस्मै नमः!

आपली जागतिक प्रार्थना ''मंत्रपुष्पांजली'' व तिचा मराठी अनुवाद आपल्या सोयीसाठी पुढे दिला आहे. लक्षपूर्वक अनुवाद वाचल्यास आपल्याला असे आढळून येईल की, ही प्रार्थना कुठल्याही धर्माची जागतिक प्रार्थना ठरण्याच्या पात्रतेची आहे.

**''मंत्रपुष्पांजली''**

ॐ यज्ञेन यज्ञमयजन्त देवास्तानि धर्माणि प्रथमान्यासन्! ते ह नाकं महिमानः सचंत यत्र पूर्वे साध्या सन्ति देवाः। ॐ राजाधिराजाय प्रसह्य साहिने नमो वयं वैश्रवणाय कुर्महे। स मे कामान् कामकामाय मह्यं कामेश्वरो वैश्रवणो ददातु। कुबेराय वैश्रवणाय। महाराजाय नमः। ॐ स्वस्ति साम्राज्यं भौज्यं स्वाराज्यं वैराज्यं पारमेष्ट्यं। राज्यं माहाराज्यमाधिपत्यमयं समंतपर्या ईस्यात् सार्वभौमः सार्वायुष आंतादापरार्धात्। पृथिव्यै समुद्रपर्यन्ताया एकराळिती। तदप्येषश्लोकोऽभिगीतो मरुतः परिवेष्टारो मरुत्तस्यावसन् गृहे। आविक्षितस्य कामप्रेर्विश्वेदेवाः सभासद इति।।

''आम्ही सर्वशक्तिमान व सर्वव्यापक परमेश्वराची नमनपूर्वक प्रार्थना करतो की, हे परमेश्वरा! तू भक्तांचे हृदगत जाणणारा आहेस. तेव्हा आम्ही मनामध्ये धरलेली इच्छा पूर्ण होवो. आमचे कल्याण होवो. आमचे साम्राज्य चोहोकडे पसरून त्यात सर्व उपभोगाचे पदार्थ उत्पन्न होवोत. त्या साम्राज्यात प्रजातंत्राने चालणारी राज्यपद्धती असो. तेथे सर्व जगतापेक्षा सर्व बाजूंनी उत्तम व्यवस्था असो. सर्व लोक परमात्मनिष्ठ होऊन मुक्तिसुखाचे अधिकारी बनोत. आम्हांला त्या साम्राज्यात विशेष अधिकार असोत. आमच्या साम्राज्यामध्ये पुष्कळ मांडलिक राजे असोत व हे सर्व मिळून होणारे मोठे राज्य चारही बाजूंनी समुद्रापर्यंत व्यापणाऱ्या पृथ्वीवर पसरलेले असो. आमचा जो अशा साम्राज्याचा सार्वभौम राजा होईल तो दीर्घायू होऊन हे आमचे सर्व साम्राज्य या सृष्टीच्या अंतापर्यंत–परार्ध कालाच्या समाप्तीपर्यंत एकसारखे नांदत राहो.''

**अरुण भास्कर कसबेकर**
९८२०२९१३६५ / ८७७९९८६६०६



# प्रतिक्रिया
## प्रा. मंगेश (शिवानंद) पालेकर यांची जन्मशताब्दी

मुखपत्रिकेच्या गेल्या अंकात प्रा. मंगेश (शिवानंद) पालेकर यांच्या जन्मशताब्दीनिमित्त लिहिलेला एक हृद्य लेख वाचनात आला व माझ्या सुखद जुन्या स्मृतींना उजाळा मिळाला. मी इंटर सायन्स होईपर्यंत ते शिकवीत होते त्या सिद्धार्थ कॉलेजमध्ये होतो. तेव्हापासून मी त्यांच्या सतत संपर्कात असे व आमच्यात जवळीकही निर्माण झाली होती. मला अजून आठवते की त्यांच्या फिजिक्सच्या वर्गाला आजुबाजूच्या बाहेरच्या कॉलेजातील विद्यार्थीसुद्धा उपस्थित असायचे. एवढी त्यांची शिकवण लोकप्रिय होती. मी एम्.एस्सी. शिकतानासुद्धा ते आमचे वर्ग घेत होते. त्यांच्या शिकविण्याची खासियत म्हणजे कुठलाही विद्यार्थी त्यांच्याकडे एखादा कठीण प्रश्न घेऊन आला तर ते त्या समस्येच्या मूळापर्यंत जाऊन विद्यार्थ्याच्या शंकेचे निराकरण करीत असत व त्यामुळे त्या विद्यार्थ्यांच्या मनात तो विषय कायमचा बिंबला जाई.

मुखपत्रिकेतील लेखात नमूद केले आहे की 'देश विदेशात मोठ्या पदावर पोचलेले त्यांचे विद्यार्थी शिवानंद भाऊंना गुरुस्थानी मानीत'. हे अगदी खरे आहे. मी परदेशात जाऊन डॉक्टरेटची पदवी प्राप्त केली, तरीही शिवानंद भाऊंनाच मी गुरुस्थानी मानतो. भारतात परत आल्यावर मी इन्स्टिट्यूट ऑफ सायन्समध्ये फिजिक्स विषयाचा विभाग प्रमुख म्हणून रुजू झालो तेव्हा ते निवृत्त झाले होते. पण विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी माझ्या विनंतीला मान देऊन दादरहून उन्हातान्हांतून स्वखर्चाने ते इंस्टीट्यूटमध्ये यायचे व विद्यार्थ्यांना जरूरीप्रमाणे मार्गदर्शन करायचे, कुठलाही मोबदला न घेता एवढी त्यांना शिकविण्याची आस्था असे. ते हाडाचे शिक्षक होते.

शिवानंदभाऊंची पत्नी म्हणजे माझ्या पत्नीची चुलतमावशी. बादरायण संबंधाने मी त्यांचा जावई! विवाहानंतर मी त्यांच्या दादर येथील निवासस्थानी जात होतो. तेथे सतत नातेवाईकांचा राबता असे. कारण ते कुटुंबवत्सल होते. त्यांच्या मिश्कीलपणाचाही मला अनुभव झाला.

त्यांच्या प्रेमळ स्मृतीस आम्हां उभयतांची आदरांजली.

– **डॉ. गजानन शि. नाडकर्णी**, अंधेरी

# पुण्य स्मरण



**श्रीमती कमल सदानंद वागळे**

देवाज्ञा १० जून २०१६

**आयुष्याच्या संध्याकाळी फसवून गेलीस आम्हांला ।**
**आमच्या दु:खी मनाची व्यथा आता सांगू कुणाला ।।**
**सोबत होती तुझी जगण्यात आनंद होता ।**
**तुझ्याविना जगणे नकोसे वाटते आता ।।**
**किती गाऊ तुझ्या गुणाची आरती ।**
**ईशकृपेने होऊ आपण पुढल्या जन्माचे सोबती ।।**

**वागळे परिवार, ठाणे**


**SHREE HOMOEOPATHIC PHARMACY**


**Wholesale & Retail For :**
**Genuine Indian & Imported Homoeopathic Medicines**

Laxmi Ratan Co-op. Hsg., Shop No. 6, Opp. Karnataka Sangh Hall, Mogal Lane, Matunga (West), Mumbai - 400 016. Tel. : 2438 3092 / 2430 9035 Mob. : 98694 83433
Time : 9.00 a.m. to 8.00 p.m. **(SUNDAY CLOSED)**

**Mrs. Nandita D. Wagle, Dr. Divya D. Wagle (BHMS. Bom.) , Dr. Dilip M. Wagle (LCEH. Bom.)**










**१. प्रकाशन स्थळ** : दि नॉर्थ कॅनरा जी. एस. बी. संघ, लक्ष्मीसदन, ३६१, व्ही. पी. रोड, मुंबई ४.

**२. प्रकाशन अवधी** : त्रैमासिक

**३. मुद्रक, प्रकाशक आणि संपादक** : दत्तात्रय नागेश नाडकर्णी, **राष्ट्रीयत्व : भारतीय**
**पत्ता** : दि नॉर्थ कॅनरा जी. एस. बी. संघ, लक्ष्मीसदन, ३६१, व्ही. पी. रोड, मुंबई ४.

**४. मालक** : दि नॉर्थ कॅनरा जी. एस. बी. संघ, लक्ष्मीसदन, ३६१, व्ही. पी. रोड, मुंबई ४

मी, दत्तात्रय नागेश नाडकर्णी, या निवेदनाद्वारे जाहीर करतो की वर दिलेला तपशील माझ्या माहितीपमाणे खरा आहे.

**मुंबई, १मार्च २०१८** **दत्तात्रय नागेश नाडकर्णी** – प्रकाशक

## निधन

| | | |
|---|---|---|
| अनिल विठ्ठल बोरकर | (कोडीबाग) | वांद्रे |
| विभा माधव बावकर | | |
| (पूर्वाश्रमीच्या उषा महाबळेश्वर वागळे) | (हाणकोण) | दादर |
| अपर्णा (मंगला) अरुण भेंडे | (हळियाळ) | ठाणे |
| रजनी मंगेश देसाई | (हन्नळ्ळी) | अंधेरी |
| शिवराय (ज्ञानेश्वर) दिगंबर देसाई | (कडवाड) | गोरेगांव |
| ध्रुवकांत शांताराम देसाई | (कडवाड) | विक्रोळी |
| कुमुद बाळकृष्ण (माधव) गायतोंडे | (हळगे) | ठाणे |
| अपर्णा उमेश गायतोंडे | (हळगे) | पुणे |
| गणपती दत्तात्रय गायतोंडे | (कासरकोड) | बोरीवली |
| स्नेहलता वेंकटेश कसबेकर | (कडवाड) | अंधेरी |
| दुर्गादास माधव कसबेकर | (कडवाड) | गोरेगांव |
| राधिका मधुसूदन कुलकर्णी | (हळगे) | मालाड |
| मालती (प्रेमा) माधव नाडकर्णी | (सांवरपै) | दादर |
| परेश मारुती नाडकर्णी | (सांवरपै) | पुणे |
| रमाबाई दत्तात्रय (देवीदास) नाडकर्णी | (अंकोला) | डोंबिवली |
| सुनंदा (प्रभा) श्रीकांत पालेकर | (बिणगे) | कॅनडा |
| श्रीकांत राजाराम पावशे | (बाड) | फोंडा |
| *वसंत नरहर फेणे | (चेंडिये) | खार |
| गिरीश काशिनाथ पिंगे | (कडवाड) | दहिसर |
| सुनंदा हरीहर रेगे | | |
| (पूर्वाश्रमीच्या सुनंदा वैकुंठ नाडकर्णी) | (सांवरपै) | पुणे |
| नलीनी अनंत राजाध्यक्ष | | |
| (पूर्वाश्रमीच्या नलीनी कृष्ण देसाई) | (कडवाड) | अंधेरी |
| शरद सुबराव तेलंग | (नंदव्हाळ) | दादर |
| कमलाकर यशवंत तेलंग | (हळदीपूर) | कारवार |
| कुसुम यशवंत वाघ | (हारवाडे) | अंधेरी |
| मोहन पद्मनाभ वाघ | (हारवाडे) | वांद्रे |
| सुलभा रामकृष्ण वाघ | (सदाशिवगड) | माहीम |
| प्रकाश जिवाजी वागळे | (वाड) | विरार |
| दिलीप सत्येन्द्रनाथ (कोरु) वागळे | (बाड) | अंधेरी |

* श्री फेणे यांनी देहदान व नेत्रदान केले आहे.



## संघास व एज्युकेशन सोसायटीस मिळालेल्या देणग्या (मागील अंकानंतर)

### उल्लेखनीय देणग्या

**श्री. जयंत मुझुमदार यांजकडून आठ लाख रुपयांची देणगी**

जुन्या पिढीतील बांधवांना संडे मार्केट, कारवार येथील 'मुझुमदार अँड कसबेकर ब्रदर्स' हे दुकान परिचित असेल. या दुकानाची स्थापना नोव्हेंबर १९०५ मध्ये झाली होती. यावरून हे दुकान किती जुने होते याची कल्पना येते. या दुकानाच्या आद्य संस्थापकांपैकी एक म्हणजे श्री. पुरुषोत्तम शामराव मुझुमदार ऊर्फ रायण्णा मुझुमदार. त्यांचे नातू श्री जयंत शामराव (भाऊ) मुझुमदार हे अमेरिकेत स्थायिक झालेले आहेत. ते बनारस हिंदू विद्यापीठाचे मेकॅनिकल इंजिनियरींगचे पदवीधर आहेत. त्यांची बहुतेक कारकीर्द डेट्रॉईट येथील जनरल मोटर्समध्ये गेलेली आहे व आता निवृत्त होऊन तेथेच स्थायिक झालेले आहेत. ते भारतासंबंधी विविध क्षेत्रात म्हणजे राजकीय, शैक्षणिक, सामाजिक, क्रीडा इत्यादि विषयांत रस घेतात व त्यांचा अभ्यासही गाढा आहे. त्यांना भाऊबंदाविषयी विशेष आपुलकी आहे. या आपुलकीतूनच त्यांनी अलीकडेच आठ लाख रुपयांची देणगी दिली आहे. त्यातील दीड लाख आजी आजोबा श्रीमती दुर्गाबाई (बायुन) व श्री मारुती मंगेश नाडकर्णी यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ समाज सेवा निधीसाठी आहेत, अडीच लाख आईवडील श्रीमती कुसुम व श्री शामराव (भाऊ) पुरुषोत्तम मुझुमदार यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ वृद्ध सेवा निधीसाठी आहेत, अडीच लाख दिवंगत बंधू श्री. सतीश यांच्या स्मरणार्थ वैद्यकीय साहाय्याप्रीत्यर्थ आहेत व उर्वरित दीड लाख आजी आजोबा श्रीमती सरस्वती व श्री पुरुषोत्तम (रायण्णा) मुझुमदार यांच्या स्मरणार्थ एज्युकेशन सोसायटीसाठी आहेत

**सौ. जयश्री फेणे यांजकडून वैद्यकीय साहाय्याप्रीत्यर्थ तीन लाख रुपयांची देणगी**

वाशी येथे राहणाऱ्या सौ. जयश्री शशिकांत फेणे या एल्फिन्स्टन कॉलेजच्या माजी विद्यार्थिनी. १९६१ साली मुंबई विद्यापीठाच्या बी.ए. परीक्षेत संस्कृत विषयात त्यांना पहिल्या वर्गात पहिला क्रमांक मिळाला होता व दोन पारितोषिकेही मिळाली होती. पती श्री. शशिकांत दिनानाथ फेणे यांची भारतात सर्वात प्रतिष्ठेची समजल्या जाणाऱ्या आय्एएस् या स्पर्धा परीक्षेत निवड झाली व त्यांची आसाम येथे नेमणूक झाली. म्हणून सौ. फेणेही तिकडे गेल्या. पदवी मिळाल्यानंतर बारा वर्षांनी त्या बी.टी. परीक्षा उत्तीर्ण झाल्या व त्यांनी शिक्षिकेचे काम स्वीकारले. नंतर त्या तेथील शाळेच्या मुख्याध्यापिका झाल्या. निवृत्तीनंतर फेणे कुटुंबीय वाशी येथे स्थायिक झाले. तेथील वरीष्ठ नागरिक संघाच्या त्या कार्याध्यक्ष आहेत. त्या संस्थेतर्फे करमणुकीचे कार्यक्रम, सहली, उद्बोधक व्याख्याने, स्थानिक हॉस्पिटलमध्ये सवलती प्राप्त करणे अशा विधायक कार्यात त्या मग्न असतात. सौ. फेणे यांनी आई वडिल श्रीमती विमल व शंकर बाळकृष्ण पालेकर व वडीलबंधू डॉ. विजयकुमार यांच्या प्रेमळ स्मृतीस अर्पण म्हणून वैद्यकीय साहाय्य निधीसाठी प्रत्येकी एक लाख याप्रमाणे एकूण तीन लाख रुपयांची देणगी दिली आहे.

**दिवंगत उमेश भेंडे निधीतून एका गरजू बांधवाला सव्वा लाख रुपयांचे साहाय्य**

मुखपत्रिकेच्या गेल्या अंकात 'संपादकीय' या सदरात अमेरिकेतील कै. उमेश भेंडे यांच्या इच्छेनुसार संघाला मिळालेल्या विक्रमी देणगीचा उल्लेख आला होता. त्यात नमूद केल्याप्रमाणे त्यांनी निधनापूर्वी संघाला पाठविलेल्या डॉलरचा धनादेश संघाला स्वीकारण्याची परवानगी नव्हती. तेव्हा त्या निधीची रक्कम नामनिर्देशीत बंधू श्री किशोर यांच्या खात्यात पडून होती. त्याच सुमारास कडवाड येथे राहणाऱ्या एका बांधवाचे जुने घर मोडकळीस आले होते. त्याच्या पुनर्बांधणीसाठी चार लाख रुपयांचा खर्च येणार होता. कारवार येथील एक समाजसेवक श्री शांताराम (अरुण) कुलकर्णी यांनी पुढाकार घेऊन बऱ्याच हितचिंतकांकडून बरीच रक्कम गोळा करून गरजू कुटुंबाला पुरविली. आपल्या संघानेही पन्नास हजार रुपयांचे साहाय्य केले. या संदर्भात काही कर्त्या ज्येष्ठ बांधवांनी किशोर यांच्याशी संपर्क साधून सर्व परिस्थिती सांगितली. त्यांनी मोठ्या तत्परतेने उमेश भेंडे निधीतून गरजू व्यक्तीला सुमारे सव्वा लाख रुपयाचे साहाय्य केले.

**स्वर्गीय श्री अरविंद कुलकर्णी यांच्या इच्छेनुसार दोन लाख रुपयांची देणगी**

आपल्या बँकेचे आद्य संस्थापक शेठ शांताराम कुलकर्णी यांचे सुविद्य नातू श्री. अरविंद जयवंत कुलकर्णी हे सुद्धा आजोबाप्रमाणेच सेवाभावी वृत्तीचे होते. टाटा सन्स सारख्या मोठ्या कंपनीतील वरीष्ठ जागेवरून अवघ्या ४० व्या वर्षी स्वेच्छा निवृत्ती स्वीकारून त्यांनी पूर्णवेळ समाजसेवेसाठी वाहून घेतले. 'संजीवनी' या सामाजिक संस्थेतून गरीबांसाठी वैद्यकीय साहाय्य देण्यासाठी ते सतत प्रयत्नशील असत. अपंग व मतिबंद विद्यार्थ्यांच्या मुंबई शहरात चालणाऱ्या सर्व शाळांशी त्यांचे जवळचे संबंध होते. प्रतिवर्षी १ मे रोजी षण्मुखानंद या प्रचंड मोठ्या सभागृहात त्या मुलांचे विविध मनोरंजनाचे कार्यक्रम आयोजित करण्यात व त्यासाठी प्रायोजक मिळविण्यात त्यांचा पुढाकार असे.

आपल्या एज्युकेशन सोसायटीचे विश्वस्त म्हणून त्यांनी वीस वर्षे धुरा वाहिली. सोसायटीच्या निधीतून जास्तीत जास्त उत्पन्न मिळविण्यासाठी गुंतवणूक कशी करायची यात ते प्रयत्नशील असत. त्यांच्या योगदानाबद्दल सोसायटीने त्यांना सन्माननीय सभासद म्हणून स्वीकृत करून त्यांचा गौरव केला. अशा या सहृदय, श्रद्धाळू, कृपाळू, कुटुंबवत्सल बांधवाचे ५ ऑगस्ट २०१३ रोजी दुःखद निधन झाले. त्यांच्याच इच्छेनुसार त्यांच्याच मिळकतीतून त्यांचे आई वडिल श्रीमती शांताबाई व श्री जयवंत शांताराम कुलकर्णी यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ संघाला व सोसायटीला प्रत्येकी एक लाख याप्रमाणे एकूण दोन लाखांची देणगी मिळालेली आहे.

**श्री. शरद सलगर यांच्या स्मरणार्थ यंदाही १ लाख ५३ हजार रुपयांची देणगी**

सदाशिवगड शाळेचे लोकप्रिय मुख्याध्यापक सलगर मास्तर यांचे चिरंजीव व टान्झानिया येथे ३५ वर्षे वास्तव्य करून चांगले नांव कमाविलेले श्री. शरद सलगर यांचे २०१२ साली दुःखद निधन झाले. त्यांच्या सुविद्य पत्नी श्रीमती रेखा सलगर प्रतिवर्षी पतीच्या स्मरणार्थ संघाच्या



समाजसेवा निधीसाठी, वृद्धसेवानिधीसीठी व एज्युकेशन सोसायटीसाठी प्रत्येकी ५१ हजार याप्रमाणे एकूण १ लाख ५३ हजार रुपयांची देणगी देतात. यंदाही त्यांनी अशाच प्रकारची देणगी दिलेली आहे.

**संघास मिळालेल्या देणग्या**

| | | |
|---|---|---|
| १. | श्री शरद नागेश सलगर यांच्या स्मरणार्थ पत्नी श्रीमती रेखा यांजकडून | ५१,००० |
| २. | श्रीमती अरुणा गजानन कुलकर्णी यांजकडून | ५००५ |
| ३. | श्रीमती शांताबाई व श्री. जयवंत शांताराम कुलकर्णी यांच्या स्मरणार्थ पुत्र श्री अरविंद यांच्या इस्टेटीतून मृत्यूपत्रातील कार्यवाहीनुसार | १,००,००० |
| ४. | श्रीमती सुधा गोविंद बोरकर यांच्या स्मरणार्थ भाचा श्री. मिलिंद दिनकर बोरकर यांजकडून | १००१ |
| ५. | एन.के.जी.एस.बी कोऑप बँकेकडून २०१७-१८ करिता | १०,००० |
| ६. | श्री घनश्याम गोपाल वर्टी यांच्या पुण्यतिथीनिमित्त कन्या श्रीमती सीमा अजय शेंबेकर यांजकडून | १५०० |
| ७. | वडील श्री. वसंत मंगेश दुभाषी व आत्या श्रीमती कुसुम मंगेश दुभाषी यांच्या स्मरणार्थ मुले उदिता, ऋग्वेदय व पुष्पक यांच्याकडून | २०००० |
| ८. | श्रीमती दुर्गाबाई (बायुन) व श्री. मारुति मंगेश नाडकर्णी यांच्या स्मरणार्थ नातु श्री जयंत शामराव मुझुमदार यांजकडून | १,५०,००० |
| ९. | श्री सदानंद गणपत नाडकर्णी यांच्या ९२ व्या वाढदिवसाच्या प्रसंगी त्यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ | ५००० |

**वृद्धसेवा निधीसाठी**

| | | |
|---|---|---|
| १. | श्री शरद नागेश सलगर यांच्या स्मरणार्थ पत्नी श्रीमती रेखा यांजकडून | ५१००० |
| २. | श्री जयवंत यशवंत नाडकर्णी यांच्या १० व्या पुण्यतिथी निमित्त पुत्र श्री. अजित याजकडून | ५००० |
| ३. | श्रीमती वृंदा व श्री गजानन वासुदेव कसबेकर यांच्या स्मरणार्थ सर्वश्री दिलीप व आनंद गणपत आरस यांजकडून | १०,००० |
| ४ | श्रीमती कुसुम व श्री शामराव (भाऊ) पुरुषोत्तम मुझुमदार यांच्या स्मरणार्थ पुत्र श्री. जयंत यांजकडून | २,५०,००० |
| ५. | श्री. कमलाकर यशवंत तेलंग यांच्या स्मरणार्थ पत्नी श्रीमती सुरेखा यांजकडून | १०,००० |
| ६. | श्रीमती सुनंदा व श्री . गोपीनाथ शिवराव वाघ यांच्या मुलांकडून नातेवाईकांच्या स्मरणार्थ | ४,५०० |

| | | |
|---|---|---|
| ७. | श्रीमती सुनंदा व श्री. गोपीनाथ शिवराव वाघ, कुमारी गोदावरी शिवराव वाघ व श्री रामकृष्ण शिवराव वाघ यांच्या स्मरणार्थ श्रीमती सुलभा रामकृष्ण वाघ यांजकडून | २,५०० |
| ८. | श्री. शांताराम (सुभाष) पुरुषोत्तम वागळे यांच्या स्मरणार्थ पत्नी श्रीमती शैलजा याजकडून | १०,००० |

**वैद्यकीय साहाय्याप्रीत्यर्थ**

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. सतीश शामराव मुझुमदार यांच्या स्मरणार्थ बंधु श्री. जयंत यांजकडून | २,५०,००० |
| २. | श्री. माधव रामदास नायक यांच्या वाढदिवसाच्या प्रसंगी त्यांच्या स्मरणार्थ कन्या श्रीमती मानसी अजीथ नायक यांजकडून | २,००० |
| ३. | श्रीमती जयश्री शशिकांत फेणे यांच्यातर्फे खालील व्यक्तींच्या प्रेमळ स्मृतीस अर्पण.वडील श्री. शंकर बाळकृष्ण पालेकर | १,००,००० |
| | आई श्रीमती विमल शंकर पालेकर | १,००,००० |
| | वडील बंधु डॉ. विजयकुमार शंकर पालेकर | १,००,००० |
| ४. | श्री. शांताराम (सुभाष) पुरुषोत्तम वागळे यांच्या स्मरणार्थ पत्नी श्रीमती शैलजा यांजकडून | १०,००० |

**एज्युकेशन सोसायटीस मिळालेल्या देणग्या**

| | | |
|---|---|---|
| १. | श्रीमती शांताबाई व श्री. जयवंत शांताराम कुलकर्णी यांच्या स्मरणार्थ पुत्र श्री. अरविंद यांच्या इस्टेटीतून (मृत्युपत्रातील कार्यवाहीनुसार) | १,००,००० |
| २. | श्री. शरद नागेश सलगर यांच्या स्मरणार्थ पत्नी श्रीमती रेखा यांजकडून | ५१,००० |
| ३. | एन. के. जी. एस. बी. को. ऑप बँकेकडून २०१७-२०१८ करिता | १०,००० |
| ४. | श्री घनश्याम गोपाल वर्टी यांच्या पुण्यतिथी निमित्त कन्या श्रीमती सीमा अजय शेंबेकरकडून | १५०० |
| ५. | श्रीमती सरस्वती व श्री पुरुषोत्तम शामराव मुझुमदार यांच्या स्मरणार्थ नातु श्री. जयंत शामराव मुझुमदार यांजकडून | १,५०,००० |
| ६. | श्री. शांताराम (सुभाष) पुरुषोत्तम वागळे यांच्या स्मरणार्थ पत्नी श्रीमती शैलजा यांजकडून | १०,००० |

**ठाणे मंच देणगीदारांची यादी**

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. विजयानंद महेश्वर नाडकर्णी, म्हार्दोळ | ३,००० |



Regd. with Registrar of Newspapers of India under Reg. No. RN37436/80






हे पत्र संपादक, मुद्रक, प्रकाशक द. ना. नाडकर्णी यांनी
दि नॉ. कॅ. गौ. सा. ब्रा. संघ, मुंबई ४, यांच्यासाठी प्रसिद्ध केले.